# 'नवजीवन'च्या 'जॉब फेअर'ला प्रतिसाद




## शेकडो विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी

**नवीन नाशिक । दि. १८ प्रतिनिधी**

शिवशक्ती चौक भागातील नवजीवन इन्स्टिटच्यूट ऑफ मॅनेजमेंटतर्फे घेण्यात आलेल्या मेगा जॉब फेअरमध्ये व्यवस्थापन शाखेतील विद्यार्थ्यांसह अभियांत्रिकी, संगणक, कला, वाणिज्य, विज्ञान अशा विविध विद्याशाखांमधील सुमारे साडेसातशेवर बेरोजगार विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विशेष असे की, यामध्ये मुलींची संख्या लक्षणीय होती.

फेअरमध्ये नोकरी मिळविण्यासाठी उत्सुक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नवजीवन संस्थेचे अध्यक्ष सुभाष देशमुख यांनी टॅलेंटसाठी स्पर्धा लागलेल्या सध्याच्या चढाओढीच्या दिवसात बेरोजगार विद्यार्थ्यांनी कॅज्युअल अॅप्रोच सोडून देऊन मुलाखतींना गांभिर्यपूर्वक सामोरे जाण्याचे आवाहन केले. यावेळी अंबड इंडस्ट्रिज अँड मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन (आयमा)चे अध्यक्ष राजेंद्र आहिरे, निमाचे धनंजय बेळे, डॉ. के. के. देव, डॉ. प्रीती कुलकर्णी, मंगल पवार आदी प्रमुख अतिथींचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन झाले.

आयमा व एमएसीसीआयए यांच्या सहकार्यात घेण्यात आलेल्या फेअरमध्ये अंबड-सातपूर एमआडीसीसह सिन्नर येथील माळेगाव, मुसळगाव, गोंदे व इगतपुरी औद्योगिक वसाहतींमधील सुमारे बत्तीस कंपन्या एकाच छताखाली सहभागी झाल्या होत्या. यतिन नंदनवार, डॉ. सुवर्णा शिंदे, अरूण भालेराव, जितेंद्र आहेर, मंगेश यादव, अमोल शिंदे व योगेश येवले आदींसह व्यवस्थापन शाखेतील विद्यार्थ्यांच्या चमुने फेअरच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

**Deshdut 19th Apr 2017**